MHYA150007022021

## नियमित दिवाणी मुकदमा क्रं.३०/२०२१ मधील नि.क्र.९ वरील आदेश

प्रतीवादी क्र. १ व २ यांनी सदरचा अर्ज हा वादीविरुध्द वादीने दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार सामील केले नसल्याने दावा काढुन टाकण्यासाठी केला आहे.

### प्रतीवादीचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे –

२. वादीने सदरचा दावा हा सरस निरस मनाने वाटप होवून त्याचा हिस्सा ताब्यात मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतीवादी क्र. १ व २ हे हजर झाले असुन वादीने दाव्यामध्ये प्रतीवादीचा सख्खा भाउ प्रभाकर दशरथ गुल्हाने तसेच सख्खे भाउ बहिण महादेव गुल्हाने सौ. रमा गुल्हाने व निर्मला जिरापुरे यांना आवश्यक पक्षकार असुन देखील मुद्दामुन सामील केले नाही, सदरचा दावा हा वाटपासाठी असल्यामुळे सदरचे पक्षकार हे सदर दाव्याचा निकाल गुणागुनावरती होण्याकरीता आवश्यक आहेत त्यामुळे सदरचा दावा खारीज करण्यात यावा.

३. वादीने सदरच्या अर्जाला निशाणी १२ कडे त्याचे म्हणणे दाखल करुन प्रतीवादीच्या कथनांचा इन्कार केला आहे. वादीचे असे कथन आहे की, वादीने धनज येथील मालमत्ता गट क्र. ४५९ या शेतजमीनीमधुन त्याच्या हिस्यावर येणारी शेतजमीनी सरसनिरस मानाने वाटप करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने दावा परिच्छेद क्र. २ मध्ये स्पष्ट नमुद केले आहे की, रमा गुल्हाने व निर्मला जिरापुरे तसेच जिजाबाई शिरभाते व प्रतीवादी यांची आजी मयत पार्वताबाई गुल्हाने यांनी सन १९८४ मध्ये वादी तसेच त्याचा भाउ दशरथ गुल्हाने व महादेव गुल्हाने यांच्या हक्कात हक्क सोडण्याचा लेख करुन दिला आहे. त्यावरुन फेरफार क्र. १०२ हा ३८ वर्षांपुर्वी घेण्यात आला त्यामुळे रमा गुल्हाने व निर्मला जिरापुर यांचा दावा मिळकतीशी काहीही संबध राहिला नाही. त्यामुळे त्यांना दाव्यामध्ये सामील केले

नाही तसेच प्रभाकर गुल्हाने व महादेव गुल्हाने यांनी तसेच प्रतीवादी क्र. १ व २ यांची बहिण ज्योती गुल्हाने व सविता राजगुरे यांनी सन २०२० मध्ये प्रतीवादी क्र. १ व २ यांच्या हक्कात सदर शेत जमीनीच्या हक्क सोडण्याचा लेख करुन दिला त्यावरुन फेरफार क्र.१६८२ झालेला आहे. त्यामुळे महादेव गुल्हाने व प्रभाकर गुल्हाने यांचा देखील सदर दावा मिळकतीबाबत संबध राहिलेला नाही. त्यामुळे त्यांना दाव्यामध्ये सामील केलेले नाही. वादी यांनी त्याच्या दाव्यात परिच्छेद क्र. २ व ३ मध्ये त्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे. प्रतीवादी क्र. १ व २ यांना सन २०२० मध्ये हक्क सोडण्याचा लेख करुन घेता आला व त्यावरुन फेरफार होवून त्यांचे नाव वाद मिळकतीमध्ये घेण्यात आले याची जाणीव असतांना देखील त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे तो खारीज होण्यास पात्र आहे.

**४.** दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथने दाव्यातील कागदपत्राचे अवलोकन केले याकामी दोन्ही बाजुल मान्य असलेली बाब म्हणजे सदरचा दावा हा वादीने वाटपासाठी दाखल केला आहे. प्रतीवादीच्या म्हणण्यानुसार याकामी प्रतीवादीचा सख्खा भाउ प्रभाकर गुल्हाने तसेच सख्खे बहिण भाउ माधव गुल्हाने, रमा गुल्हाने व निर्मला जिरापुरे यांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार असतांना देखील सामील करण्यात आले नाही. परंतु वादीच्या कथनानुसार विचार करावयाचा झाल्यास वादीने निशाणी ३ सोबत अनुक्रमांक ५ वरती फेरफार क्र. १०२ दाखल केला आहे त्यामध्ये रमा गुल्हाने व निर्मला जिरापुरे यांनी त्यांचा दावा मिळकतीतील हक्क हा दशरथ गुल्हाने, महादेव गुल्हाने व मोतीराम गुल्हाने यांच्या लाभात सोडुन दिल्याचे दिसुन येत आहे. प्रभाकर गुल्हाने व महादेव गुल्हाने यांनी फेरफार क्र.१६८२ नुसार प्रतीवादी क्र. १ दिपक गुल्हाने व प्रतीवादी क्र. २ नंदकिशोर गुल्हाने यांच्या लाभात हक्क सोडुन दिले आहेत त्यामुळे प्रतीवादी कथन करीत असल्याप्रमाणे प्रभाकर गुल्हाने, महादेव गुल्हाने, रमा गुल्हाने व निर्मला गुल्हाने हे दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार होत नाहीत कारण त्यांनी त्यांचा हक्क सोडुन दिलेला आहे त्यांच्याशिवाय देखील सदर दाव्याचा निकाल गुणागुणांवरती होवू शकतो. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतीवादींचा निशाणी ९ वरील अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाबद्दल कोणताही आदेश करण्यात येत नाही.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)

स्वा/-

दिनांक १०/११/२०२३ ( वि.सा.शिंदे )

नेर दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नेर.